# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक ४ चे इतिवृत्त्

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक ०६/०३/२०२४ सकाळी १२-०० वाजता भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ६. | श्री. समिर शेख | सहा. आयुक्त |
| ७. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ८. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मूल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ११. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १२. | श्री. एन. के. बागुल | शाखा अभियंता |
| १३. | श्री. पी.डी. चव्हाण | सहा. अभियंता |
| १४. | श्री.सी. एम. उगले | सहा.अभियंता,पा.पु.वि. |
| १५. | श्री. हेमंत पावटे | कनिष्ठ अभियंता,बांधकाम विभाग |
| १६. | श्री. प्रकाश सोनवणे | नगररचना विभाग |
| १७. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १८. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १९. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| २०. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |
| २१. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक,आस्थापना विभाग |
| २२. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २३. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |

| | | |
|---|---|---|
| २४. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २५. | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल,शिक्षण मंडळ |
| २६. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २७. | श्री.अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २८. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

तद्नंतर धुळे महानगरपालिकेत शासनाच्या आदेशानुसार नवनियुक्त सहा.आयुक्त श्री.समीर शेख यांची बदली झालेली असून ते आजच्या पहिल्या बैठकीस उपस्थिती असल्याने त्यांचे पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-२० धुळे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात दररोज संकलन होणाऱ्या कचऱ्यावर प्रायोगीक तत्वावर शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याबाबतचा प्रकल्प उभारणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

सहा. आरोग्यधिकारी घनकचरा व्यवस्थापन हा स्वच्छ भारत मिशनाचा एक महत्वाचा घटक आहे याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होतो इंदाई रिसायकल्स ही कचरा व्यवस्थापनामधील कंपनी आहे. धुळे शहरातील संकलन होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणार आहे त्यासाठी त्यांनी मनपाच्या प्रकल्प साईटवर जागेची मागणी केली आहे ते स्वत: सीएसआर प्रकल्प उभारणार आहे. नविन मशिनरी उभी करणार आहे. धोरणात्मक निर्णय घेणे कामी व जागा उपलब्ध करुन देणे कामी विषय महासभेपुढे सादर केला आहे.

मा.प्रशासक यासाठी किती जागेची आवश्यकता आहे?

म.अभियंता सद्यस्थितीत १ एकर जागेची मागणी आहे. याबाबत त्यांच्याशी करारनामा वर्षभरासाठीचा राहील. सदर संपूर्ण खर्च त्यानेच करायचा आहे. आपण फक्त कचरा प्रकल्प उभारून देऊ कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाट लावणे हा खर्च ती कंपनी करणार त्यासाठी आपण त्यांना अटी शर्ती टाकून देऊ. आणि कामाचे मूल्यमापन करुन पुढील कार्यवाही करु. जागा भाडेतत्वावर जशी देतो त्याप्रमाणे देऊ. मालकी मनपाची राहिल

मा.प्रशासक याचे सादरीकरण ठेवा आपल्याकडे एमपीसीबीचे कंसेंट बघून कायदेशिर बाबींची छाननी करुन मगच करारनामा करुन हस्तांतरीत करा. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २० दिनांक ०६/०३/२०२४**

स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत शहर घनकचरा व्यवस्थापन (CSWAP) कृती आराखड्यास अनुसरुन अंमलजावणी करणे गरजेचे आहे.उक्तबाबत इंदाई रिसायकलर्स

कंपनी यांनी पत्र सादर केलेले आहे. कचरा व्यवस्थापना मध्ये नाविन्यपुर्ण कंपनी आहे. ह्या कंपनीद्वारे धुळे शहरातील संकलन होणाऱ्या कचऱ्यावर ११४ मे.टनापैकी २५ ते ३० मे.टन (प्रायोगीक तत्वावर) प्रक्रिया करुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणार आहे. त्यासाठी त्यांना मनपाच्या प्रकल्प साईटवर जागा उपलब्धतेची मागणी केलेली आहे.

तसेच घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नाविन्यपुर्ण अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणार आहेत. त्यासाठी CSR च्या माध्यमातुन निधीची उपलब्धता करुन (प्रायोगीक तत्वावर) प्रकल्प उभारणी करीता मान्यता मागणी केली आहे.

उपरोक्त प्रस्तुत प्रकल्पासाठी प्रस्तावात नमूद अटी व शर्तीनुसार प्रकल्प धारकाची भुमिका आणि जबाबदारी निश्चीत करुन देण्यासाठी प्रस्ताव सादर झालेला आहे.

धुळे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात दररोज संकलन होणाऱ्या कचऱ्यावर इंदाई रिसायकलर्स यांना प्रायोगीक तत्वावर शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणेकामी प्रस्तावातील नमूद अटी शर्तीनुसार वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. याकामी आवश्यक ती मशिनरी,मनुष्यबळ इ.अनुषंगीक व्यवस्था सदर संस्थेने सी.एस.आर.फंडातून करावी. तसेच सदर संस्थेस गांडूळ खत प्रकल्पातील उपलब्ध असलेल्या जागेतील १ एकर जागा उपलब्ध करून द्यावी. सदर संस्थेशी मनपाच्या आवश्यक त्या अटी व शर्तीचा करारनामा करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२१ विकास शुल्क निधीअंतर्गत १ ते ८ विद्युत विषयक कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता शासनाच्या मूलभूत सोई सुविधा अंतर्गत २३-२४ मध्ये विद्यूत पोलसाठी मंजरी उपलब्ध झाली आहे. त्या एल.ई.डी. बसविणेची बाब समाविष्ठ नव्हती. आपण मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठवले एलईडी पथदिवे याबाबतचा समावेश नव्हता. त्याकरीता ३२६ एल.ई.डी पथदिवे याबाबतचा समावेश नव्हता त्याकरीता ३२६ एलईडी पथदिवे लावण्याबाबचे २२ लक्ष १० हजार रुपयांचे अंदाजपत्रक आहे ते आपण प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केले आहे. तसेच विकास शुल्कातील अत्यावश्यक कामे होणे बाबत मा. खासदार साहेब यांनी पत्र दिले होते ते पत्र मी नगरसचिव यांचे कडे दिले आहे. त्या कामांनाही विकास शुल्क निधीअंतर्गत मान्यता

द्यावी. तसेच सदर प्रस्तवातील मूळ काम हे मूलभूत सोई सुविधांतर्गत आहे. साधारणत: ३२६ पोल लावण्याचे शासनाने दिलेले नाही. ते काम विकासशुल्कांतर्गत घेणार आहोत.त्या कामांचाही समावेश विकासशुल्क निधी अंतर्गत करावा ही विनंती याबाबत मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

म.शाखा अभियंता(विद्युत)सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रतावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१ दिनांक ०६/०३/२०२४**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या अंतर्गत सन २०२३-२४ करिता धुळे महानगरपालिकेस १ ते १४ कामे रु ३ कोटीच्या मर्यादेत कामे निश्चित केली आहेत.१ ते १४ कामांपैकी अ.क्र ७ ते १४ एकूण ८ कामे विद्युत विषयक आहे.

म.जिल्हाधिकारी ,धुळे यांच्या कडे १ ते १४ कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी साठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. अ.क्र ७ ते १४ कामे एल.ई.डी.बल्ब वगळुन असून फक्त नवीन पोल बसविणे आहेत. उक्त प्रस्तावाच्या तांत्रिक मंजुरीसह फक्त नवीन पोल बसविणे बाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी साठी म.जिल्हाधिकारी सो यांच्या कडे महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या अंतर्गत सन २०२३-२४ करिता उक्त शांसन अन्वये पाठविण्यात आले आहे.

उक्त ७ ते १४ कामाच्या अंदाजपत्रकात नवीन 6 m high (clear height) galvanised octagonal pole - १८६ आणि 7 m high (clear height) galvanised octagonal pole – १४० असे एकूण – ३२६ पोल मुख्य रस्त्यांवर व विविध ठिकाणी बसविणे समावेश आहे.

उक्त कामांच्या अंदाजपत्रकात फक्त नवीन पोल बसविणे समावेश असल्यामुळे सदर एकूण ३२६ पोलवर नवीन एल.ई.डी म.न.पा मार्फत बसविणे आवश्यक आहे .

उक्त ७ ते १४ कामाच्या एकूण ३२६ पोलवर एकूण 60W , 70-75W ३२६ पोलवर नवीन एल.ई.डी म.न.पा मार्फत बसविणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम **२२,१०,७५८ /- मात्र** प्रस्तावित आहे.

शासन निर्णयानुसार उक्त ७ ते १४ कामाच्या अंदाजपत्रकातील एकूण ३२६ नवीन पोलवर एकूण 60W , 70-75W चे ३२६ पोलवर नवीन एल.ई.डी म.न.पा मार्फत बसविणेसाठी नगररचना विभागाकडील विकास शुल्क निधी मधून प्रस्तावित करण्यात येत आहे.

शासन निर्णयानुसार उक्त ७ ते १४ कामाच्या अंदाजपत्रकातील एकूण ३२६ नवीन पोलवर एकूण 60W , 70-75W चे ३२६ पोलवर नवीन एल.ई.डी म.न.पा मार्फत विकास

शुल्क निधी अंतर्गत बसविणेसाठी येणाऱ्या खर्च रक्कम रू.२२,१०,७५८/- मात्रला वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

तसेच म.शहर अभियंता यांच्या सुचनेनुसार खालील अत्यावश्यक कामे विकास शुल्क निधीअंतर्गत प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र क्र १४ मध्ये तांदळे घरापासून व अली असगर ते अली असगर ते शिवकुमार शर्मा आणि कोरके नगर सुगंध नगर स्नेह नगर सप्तशृंगी नगर छोरीया नगर भागात रस्ता कॉंक्रीट व बंदिस्त पाईप गटार करणे | ९९,९९,९३९/- |
| २ | प्र क्र १४ मध्ये प्रकाश उभाळे ते रामवाडी गेट व बर्फ कारखाना मागची गल्ली व अंबिका नगर विठ्ठल नगर कल्पतरू सोसायटी राम मंदिरासमोर भागात रस्ता कॉंक्रीट व बंदिस्त पाईप गटार करणे | १,९९,९९,१७४ |

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२२ बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया ,धुळे हया संस्थेने जुन्या महानगरपालिके समोरील चौक स्वखर्चाने सुशोभिकरण करणेकामी परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता माजी आमदार अनिल गोटे यांनी शहरातील पुतळे व चौक सुशोभिकरणबाबत तक्रार केलेली आहे. तसेच चौक सुशोभिकरणासाठी उपसंचालक, नगररचना,वाहतूक परिवहन शाखा, संभाजीनगर यांची ही परवानगी घेण्यात यावी.

मा.प्रशासक हे काम करतांना वाहतूकीला अडथळा ठरणार नाही, याकरिता पोलिस डिपार्टमेंटची परवानगी घ्यावी. त्यांची एनओसी घ्यावी. मगच प्रोसेस करा. सोबतच आराखडे व त्याचे काम चालू करुन घ्या.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २२ दिनांक ०६/०३/२०२४**

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया ,धुळे संस्था धुळे शहरात कार्यरत असून कामाचे संस्थेमार्फत धुळे शहराच्या विकासास सदर संस्थेचे योगदान असावे या दृष्टीकोनातून धुळे

महानगरपालिकेच्या जुन्या महानगरपालिकेच्या बिल्डींग समोरील चौकात सुशोभिकरण स्वखर्चाने करणेबाबत सदर संस्थेस विकासात्मक कामांसाठी धुळे महानगरपालिकेची परवानगी मिळणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

उक्त बाबत पत्रात नमूद जुन्या महानगरपालिकेच्या बिल्डींग समोरील चौकात सुशोभिकरण स्वखर्चाने करण्यास परवानगी मिळणेकामी मे.महासभेची आवश्यकता आहे. संबधित संस्थेने जागेचे location प्लान जोडला असून नियोजित चौक सुशोभीकरण आराखडा सादर केलेला नाही. उक्त बाबत नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून नियोजित आराखड्यास परवानगी घेणे आवश्यक आहे.

जुन्या महानगरपालिकेच्या बिल्डींग समोरील चौक स्वखर्चाने बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया ,धुळे यांना सुशोभिकरण करण्यास मनपाच्या अटी शर्तीनुसार वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. याबाबत उपसंचालक, नगररचना,वाहतूक परिवहन शाखा, संभाजीनगर, शहर वाहतूक शाखा, व पोलीस विभागाची परवानगी आवश्यक राहील तसेच चौक सुशोभिकरणाचा आराखडा प्रथम मान्यता घेण्यासाठी मनपाकडेस सादर करावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२३ रोटरी क्लॅब धुळे,रेड क्रॉस,धुळे हया संस्थेने कमलाबाई शाळेजवळ असलेला पूर्वीपासून अस्तित्वात चौकास सुशोभिकरण करणेकामी परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.अभियंता याबाबतही शहर वाहतूक शाखेची व नगररचनाची मंजूरी घेऊनच पुढील कार्यवाही करु.

म.कार्यकारी अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २३ दिनांक ०६/०३/२०२४**

रोटरी क्लब ऑफ ,धुळे क्रॉस रोड,धुळे शहरात कार्यरत असून कामाचे संस्थेमार्फत धुळे शहराच्या विकासास सदर संस्थेचे योगदान असावे या दृष्टीकोनातून पुर्वीपासून अस्तित्वात असलेले कमलाबाई शाळेजवळ असलेला चौकास सुशोभिकरण स्वखर्चाने

करणेबाबत सदर संस्थेस विकासात्मक कामांसाठी धुळे महानगरपालिकेची परवानगी मिळणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

उक्त बाबत नमूद पत्रात कमलाबाई शाळेजवळ असलेला पूर्वीपासून अस्तित्वात चौकास सुशोभिकरण स्वखर्चाने करण्यास परवानगी मिळणेकामी मे.महासभेची आवश्यकता आहे. संबधित संस्थेने जागेचे location प्लान जोडला असून नियोजित चौक सुशोभीकरण आराखडा सादर केलेला नाही. उक्त बाबत नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून नियोजित आराखड्यास परवानगी घेणे आवश्यक आहे.

कमलाबाई शाळेजवळ असलेला पूर्वीपासून अस्तित्वात चौक, रोटरी क्लब ऑफ ,धुळे क्रॉस रोड,धुळे हे स्वखर्चाने सुशोभिकरण करण्यास मनपाच्या अटी शर्तीनुसार वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. याबाबत उपसंचालक,नगररचना,वाहतूक परिवहन शाखा, संभाजीनगर, शहर वाहतूक शाखा, व पोलीस विभागाची परवानगी आवश्यक राहील तसेच चौक सुशोभिकरणाचा आराखडा प्रथम मान्यता घेण्यासाठी मनपाकडेस सादर करावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-२४ | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतील कामात बदल करून तसा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो.यांच्या कडेस सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.अभियंता | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्था योजनेतील कामात बद्दल करून तसा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्या कडेस सादर करावा लागणार आहे. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २४ दिनांक ०६/०३/२०२४**

शासन निर्णयात नमूद निकषानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनासाठी १ ते १३८ कामांचा ठराव पारित करण्यात आलेला होता. त्यानुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र.धुमपा/बां..वि./२७२/ दि.०८/०२/२०२४ अन्वये १३८ कामांचा एकूण रु.३१,२८,५०,७६३/- मात्र रकमेचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला होता.

सदर ठरावातील अ.क्र. १५ प्रभाग क्र.१ वलवाडी शिवार इंद्रप्रस्थ कॉलनी मधील श्री.चेतन पाटील भाऊसाहेब यांच्या घरापासून ते सुशी नाला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.तथापि सदरचे काम महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजने अंतर्गत मंजूर असल्याने सदरचे काम ऐवजी काम प्रभाग क्र.१ वलवाडी शिवार इंद्रप्रस्थ कॉलनी मधील श्री. सुर्वे यांच्या घरापासून ते प्लॉट नं.१२२ पर्यंत रस्ता कॉंक्रिट करणे असा बदल करणे आवश्यक आहे.

तसेच सदर ठरावातील अ.क्र.४३ प्रभाग क्र.१ इंद्रप्रस्थ कॉलनी ते दुबे सर ते उत्तरेकडील सुशीनालापर्यंत बंदिस्त पाईप गटार करणे कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.तथापि सदर भागांतील नागरिकांनी स्वखर्चाने सदर ठिकाणी बंदिस्त पाईप गटारीचे काम करून घेतले असल्याने सदरचे कामा ऐवजी प्रभाग क्र.१ इंद्रप्रस्थ कॉलनी मधील डॉ.सागर देवरे यांच्या घरापासून ते चव्हाण रावसाहेब यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे असा बदल करणे आवश्यक आहे.

उक्त अहवालानुसार सदर काम बदल करणेस व मा.जिल्हाधिकारी सो.यांच्याकडेस प्रस्ताव सादर करणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**म.शहर अभियंता** याठिकाणी नमूद करू इच्छितो की, केंद्रशासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा क्रमांक २ व पाणी पुरवठा योजनासाठी नागरी स्वराज्य संस्थेच्या हिस्सासाठी Urban Infrastructure Development Fund (UIDF) योजनेअंतर्गत अनुदान मागणीसाठी प्रस्ताव सादर करावा लागणार आहे. यापुर्वी मे.महासभेत धुळे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनाच्या कर्ज मागणीबाबत एकत्रित ठराव करण्यात आलेला होता. तथापी शासन निर्देशानुसार योजनानिहाय अनुदान तथा कर्ज मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे. पुढील कालावधीत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक लागून आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने दोन्ही योजनांचा अनुदान मागणीबाबत स्वतंत्र ठराव शासनाकडेस सादर करावा लागणार आहे. त्यामुळे त्याबाबत दोन्ही योजनांसाठी स्वतंत्र प्रस्ताव नगरसचिव यांच्याकडेस सादर केलेले आहे. कालमर्यादा लक्षात घेता आजच्या प्रशासकीय महासभेत याबाबत ठराव होणेस शिफारस करण्यात येत आहे.

**मा.प्रशासक** म.शहर अभियंता यांच्या निवेदनानुसार कामांची आवश्यकता व कालमर्यादा लक्षात घेवून याबाबत राज्यशासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्रमांक:-२५ केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण (टप्पा क्र.२) प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नागरी स्वराज्य संस्थेच्या हिस्सासाठी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत अनुदान मागणीबाबत प्रस्ताव शासनाकडेस सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सहा. अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

म.शहर अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २५ दिनांक ०६/०३/२०२४**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण (टप्पा क्र.२) प्रकल्पास रु.७१४.५१ कोटी मात्रस महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. अमृत- २०२३/ प्र.क्र. ३९७ / नवि- ३३ मंत्रालय मुंबई - ४०० ०३२ दि. १७ ओक्टोंबर, २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. शासन निर्णयान्वये केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार राज्यामध्ये अमृत २.० अभियान राबविण्यास शासन मान्यता दिली आहे. अमृत २.० अभियान अंतर्गत नागरी स्वराज्य स्थानिक संस्था मार्फत सादर होणाऱ्या प्रकल्पा साठी एकूण प्रकल्प किमंती पैकी केंद्र शासन, राज्य शासन व नागरी स्वराज्य संस्थांचा आर्थिक हिस्स्याचे वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे आहे.

| नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | केंद्र शासन हिस्सा (%) | राज्य शासन हिस्सा (%) | नागरी स्थानिक स्वज्य संस्थेचा हिस्सा (%) |
|---|---|---|---|
| ड वर्ग महानगरपालिका | ३३.३३ | ३६.६७ | ३० |

केंद्र शासन अमृत २.० अंतर्गत नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% एवढा ठेवण्यात आलेला आहे. वस्तुतः महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हालाकीची असल्याने स्व हिस्सासाठी निधी उभारणी करणे आर्थिक दृष्ट्या अवघड आहे.

सबब सदर केंद्र शासन अमृत २.० अभियान अंतर्गत निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील महानगरपालिकेचा ३०% स हिस्स्या पोटी रक्कम रु.२१४.३५ कोटी होत आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदर निधीची उभारणी करणे करीता Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत रक्कम रु.२१४.३५ कोटी कर्ज मागणी करणे योग्य वाटते.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत अंमलबजावणीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधा मधील नागरी स्थानिक संस्थेचा हिस्स्यासाठी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत स्व: हिस्सासाठी निधी उभारणी करिता रक्कम रु.२१४.३५ कोटी कर्ज उभारणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे कामी मे.महासभेपुढे मंजूरीसाठी पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण (टप्पा क्र.२) अंमलबजावणी करणेस्तव शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधा मधील नागरी स्थानिक संस्थेचा हिस्स्यासाठी Urban Infrastructure Development Fund (UIDF) योजने अंतर्गत प्रस्ताव राज्यशासनाकडेस सादर करणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२६ केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत धुळे शहर पाणी पुरवठा योजना प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नागरी स्वराज्य संस्थेच्या हिस्सासाठी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत अनुदान मागणीबाबत प्रस्ताव शासनाकडेस सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सहा. अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

म.शहर अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २६ दिनांक ०६/०३/२०२४**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजना प्रकल्पास रु.१४२.७६ कोटी मात्रस महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. अमृत-२०२३/ प्र.क्र. ४०१ / नवि- ३३ मंत्रालय मुंबई - ४०० ०३२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. शासन निर्णयान्वये केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार राज्यामध्ये अमृत २.० अभियान राबविण्यास शासन मान्यता दिली आहे. अमृत २.० अभियान अंतर्गत नागरी स्वराज्य स्थानिक संस्था मार्फत सादर होणाऱ्या प्रकल्पा साठी एकूण प्रकल्प किमंती पैकी केंद्र शासन , राज्य शासन व नागरी स्वराज्य संस्थांचा आर्थिक हिस्स्याचे वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे आहे.

| नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | केंद्र शासन हिस्सा (%) | राज्य शासन हिस्सा () | नागरी स्थानिक स्वज्य संस्थेचा हिस्सा (%) |
|---|---|---|---|
| ड वर्ग महानगरपालिका | ३३.३३ | ३६.६७ | ३० |

केंद्र शासन अमृत २.० अंतर्गत नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% एवढा ठेवण्यात आलेला आहे. वस्तुतः महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हालाकीची असल्याने स्व हिस्सासाठी निधी उभारणी करणे आर्थिक दृष्ट्या अवघड आहे.

सबब सदर केंद्र शासन अमृत २.० अभियान अंतर्गत निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील महानगरपालिकेचा ३०% हिस्स्या पोटी रक्कम रु. ४२.८३ कोटी होत आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदर निधीची उभारणी करणे करीता Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत रक्कम रु. ४२.८३ कोटी कर्ज मागणी करणे योग्य वाटते.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत अंमलबजावणीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधा मधील नागरी स्थानिक संस्थेचा हिस्स्यासाठी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत स्व: हिस्सासाठी निधी उभारणी

करिता रक्कम रु. ४२.८३ कोटी कर्ज उभारणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे कामी मे.महासभेपुढे मंजूरीसाठी पाणी पुरवठा विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी करणेस्तव शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधा मधील नागरी स्थानिक संस्थेचा हिस्स्यासाठी Urban Infrastructure Development Fund (UIDF) योजने अंतर्गत प्रस्ताव राज्यशासनाकडेस सादर करणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**